**4. गट विमा योजना** -

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना 1982 पासून अंमलात आली. 1 मे 1982 रोजी शासकीय सेवेत असणाऱ्या किंवा त्या तारखेनंतर प्रवेश केलेल्या अनिवार्य असलेल्या सर्व कर्मचार्यांना ही योजना लागू करण्यात आली आहे.

1. गट विमा योजनेचे नामनिर्देशन हे कार्यालयास प्रपत्र 5 (परि.19.5) नुसार विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. सदर सेवापुस्तकात नामनिर्देशन कार्यालयप्रमुखांनी स्विकृत करुन त्यावर त्यांनी स्वाक्षरी केली असल्याची खात्री करावी. नामनिर्देशनाची नोंद मूळ सेवा पुस्तकांत घेणे आवश्यक आहे.

2. गट विमा योजनेचे सदस्य झालेबाबतची नोंद सेवापुस्तकात करणे आवश्यक आहे. वेळोवेळी वर्गणीच्या दरात होणाऱ्या बदलानुसार वर्गणी वसूल होत असल्याची खात्री करुन तशी नोंद सेवापुस्तकात वेळोवेळी घ्यावी. तसेच कर्मचारी/अधिकारी यांचे पदोन्नतीमुळे वर्ग बदलल्यास बदललेल्या वर्गाप्रमाणे वर्गणी वसूल होत असल्याची खात्री करुन तशी नोंद सेवापुस्तकात घ्यावी.

3. गट विमा योजनेची गणना (GIS CALCULATOR) करणेकरीता खालील Link वर क्लिक करावे.https://mahakosh.maharashtra.gov.in/gis/index.php

वरील लिंकवर जाऊन खालील प्रमाणे माहीती भरा.

महाराष्ट्र राज्य गट विमा योजना १९८२ - बचत निधी गणनेसाठी फॉर्ममध्ये माहिती भरण्याची प्रक्रिया

1. कर्मचाऱ्याचे नाव (Employee Name) - अर्जदाराचे पूर्ण नाव भरावे.
2. पदनाम (Designation) - सध्या असलेले पदनाम (उदा. वरिष्ठ लेखापरीक्षक, लेखापाल इ.) नमूद करावे.
3. कार्यालयाचे नाव (Office Name) - ज्या विभाग/कार्यालयात कार्यरत आहात ते नाव लिहावे.
4. गवियो सदस्यत्व दिनांक (GIS Membership Date) - ज्या दिवशी कर्मचारी गट विमा योजनेत सामील झाला तो दिनांक dd-mm-yyyy स्वरूपात लिहावा. (उदा. 15-08-2010)
5. सदस्यत्वाच्या वेळी कर्मचाऱ्याचा वर्ग (Employee Class at the time of Membership) -
    - गट A (Class I)
    - गट B (Class II)
    - गट C (Class III)
    - गट D (Class IV)

    यापैकी योग्य वर्ग निवडावा.
6. सेवा समाप्तीचा दिनांक (Date of Service Termination) - सेवानिवृत्ती / राजीनामा / मृत्यू दिनांक dd-mm-yyyy स्वरूपात भरावा.

7. अंतिम गणना उपलब्ध कालावधी (Calculation Available Year) -
    - ही गणना फक्त 2011 ते 2025 या कालावधीत उपलब्ध आहे.
    - योग्य कालावधी निवडून तपशील भरावा.

टीप:

- सर्व तारखा dd-mm-yyyy स्वरूपातच लिहाव्यात.
- चुकीची माहिती भरल्यास गणना अयोग्य होईल.